## नियमीत दिवाणी दावा क्र. १४/२०१६

**निशाणी क्र. ५ खाली आदेश :—**

१. वादीने सदर अर्जाद्वारे त्यास प्रतिवादींविरुध्द तुर्तातूर्त मनाई हुकूम मंजुर व्हावा अशी विनंती केली आहे. वादीचे थोडक्यात प्रकरण खालीलप्रमाणे.

२. वादीचे म्हणणे की, प्रतिवादी क्र. १ हा वादीचा भाऊ असून प्रतिवादी क्र. २ वादीची भाऊजायी म्हणजेच प्रतिवादी क्र. १ ची पत्नी व प्रतिवादी क्र. ३ ही वादी व प्रतिवादी क्र. १ यांची विवाहीत बहिण आहे. दावा मिळकत म्हणजे मनमाड नगरपरिषद हद्दीतील सर्व्हे नंबर ३८०/२० पैकी प्लॉट नं. १२ वरील रहिवासी घर व त्यालगत असलेली खुली जागा ही वादी व प्रतिवादी क्र. ३ यांची आई सुशिलाबाई गोविंदराव मोरे यांचे नावे एकत्र कुटूंबातील वडीलांच्या नोकरीच्या उत्पन्नातून तसेच शेतीच्या उत्पन्नातून खरेदी घेतलेली होती. त्या मिळकतीत वादी व त्याचे कुटूंबिय तसेच प्रतिवादी राहत आहेत. वादी यांचे वडील रेल्वे खात्यात नोकरीस होते. ते हयात असतांना त्यांचे नावे एकत्र कुटूंबातील पगार व उत्पन्नातून मिळकत खरेदी घेण्यासाठी रेल्वे विभागाची पुर्व परवानगी घ्यावी लागत असलेने त्यांनी त्यांची पत्नी सुशिलाबाई यांचे नावावर दावा मिळकत एकत्र कुटूंबाकरीता खरेदी घेतलेली होती व खरेदी तारखेपासून सदर मिळकतीत सर्व एकत्र कुटूंब राहत होते. वादी व प्रतिवादी क्र. १ व ३ यांची आई मयत झालेनंतर वादी हा त्याचे कुटूंबासह दावा मिळकतीच्या पुर्व—आग्नेय कोप—यात असलेल्या बेडरुममध्ये राहतो व त्या शेजारी असलेल्या किचन रुम हा वादीचे ताब्यात व वापरात आहे. तसेच प्रतिवादी क्र. १ व २ हे दावा मिळकतीच्या पश्चिम—नैऋत्य कोप—यातील रुममध्ये राहतात व ते हॉलचा वापर किचन म्हणुन करतात. संडास व बाथरुम व त्यावरील माळे हे वादी व प्रतिवादीचे सामुहिक वापरात आहे. वादी हा त्याच्या ताब्यातील मिळकतीत जाण्यासाठी दक्षिण दिशेला असलेल्या दरवाजातुन वापर वहिवाट करतो तर प्रतिवादी क्र. १ व २ हे उत्तर दिशेने असलेल्या दरवाजातुन त्यांचे ताब्यातील मिळकतीचा

वापर वहिवाट करतात.

३. वादीचे पुढे म्हणणे की, प्रतिवादी क्र. १ व २ यांनी दिनांक २३/०३/२०११ रोजीचे रजिष्टर मृत्युपत्र नं. ९५१/२०११ चे सुशिलाबाई गोविंदराव मोरे यांचेकडून स्वतःचा सक्रिय सहभाग ठेवून करवून घेतलेले आहे. तसेच सुशिलाबाई यांच्या वार्धक्यातील आजारपणाचा, मानसिक दुर्बलतेचा व अडाणीपणाचा गैरफायदा घेवुन त्यांची फसवणुक करुन प्रतिवादी क्र. १ व २ यांनी त्यांचे मर्जीतील साक्षीदारांनी बोगस लेखनिकाद्वारे व खोटे वैदयकिय प्रमाणपत्र आणुन कायदेशीर तरतुदींचा भंग करुन सदरचा दस्त अस्तित्वात आणलेला आहे. एकत्र कुटूंबातील घर व खुल्या जागेचे प्रतिवादी क्र. १ व २ यांना मृत्युपत्र करुन नोंदवून घेणेचा व स्वतःचा फायदा करुन घेण्याचा त्यांना अधिकार नव्हता व नाही. सदरचे मृत्युपत्र हे वादी व प्रतिवादी क्र. ३ यांचे एकत्र कुटूंबातील हक्क व हिस्से नष्ट करणारे व एकत्र कुटूंबाच्या मिळकतीचे हक्क डावलणारे केलेले आहे. सदर बेकायदेशिर दस्ताद्वारे तसेच ते वादी व प्रतिवादी क्र. ३ यांचे अपरोक्ष केले असल्याने ते त्यांच्या अविभाजीत हिस्स्यांवर व हक्कांवर मुळीच बंधनकारक नाही. वादी सध्या दावा मिळकतीत त्याच्या कुटूंबासह रहात आहे परंतू ही बाब मृत्युपत्रात जाणीवपुर्वक नमुद करण्याचे टाळले आहे.

४. वादीचे पुढे म्हणणे आहे की, प्रतिवादी क्र. १ व २ यांनी सुशिला गोविंदराव मोरे यांच्या दिनांक १७/१२/२०१४ मृत्यु पश्चात दिनांक २३/०३/२०११ रोजीचे मृत्युपत्र नोंदणीसाठी मंडल अधिकारी, नांदगांव यांचेकडे अर्ज केला होता. त्याची माहिती वादीला मिळाल्याने त्याने व प्रतिवादी क्र. ३ ने हरकत घेतली. त्यानुसार फेरफार क्र. २९५३८ ची सुनावणी होवून फेरफार नोंद क्र. २९५३८ दिनांक २३/०६/२०१५ रोजी सर्व वारसांचे नांवे मंजुर करण्यात आली व त्यामध्ये सर्व वारसांच्या नोंदी रेकॉर्डला नोंदविण्याचा आदेश झाला होता. त्या निकालाविरुध्द प्रतिवादी क्र. १ व २ यांनी उपविभागीय अधिकारी, येवला यांचेकडे आर.टी.एस. अपिल क्र. ७४/२०१५ दाखल केले व त्यामध्ये दिनांक

१२/०१/२०१६ रोजी फेरफार नोंद क्र. २९५३८ रद्द करण्यात येवून नोंदणीकृत मृत्युपत्र क्र. ९५१/२०११ नुसार दावा मिळकतीत प्रतिवादी क्र. १ व २ यांच्या नावाचा अंमल करण्याचा आदेश करण्यात आला. त्या निकालाविरुध्द वादीने अप्पर जिल्हाधिकारी, मालेगांव यांचेकडे दुसर आर.टी.एस. अपिल नं. २०/२०१६ दाखल केले असून ते प्रलंबित आहे. दिनांक १२/०१/२०१६ रोजीच्या हुकूमामुळे प्रतिवादी क्र. १ व २ यांची नांवे दावा मिळकतीवर असलेने ती मिळकत आमची आहे, ती खाली करुन देणेबाबत वादीला तगादा लावीत आहेत. त्यामुळे वादीच्या वास्तव्यास हरकत होवुन त्यास दावा मिळकतीतून प्रतिवादी क्र. १ व २ हे हुसकावून लावण्याचा प्रयत्न करीत आहेत. तसे झाल्यास वादी व त्याचे कुटूंबाचे अपरिमीत नुकसान होणार आहे. वादीस राहण्यासाठी दुसरे कोणतेही घर नाही. वादी व प्रतिवादी क्र. ३ चा हिस्सा हडप करण्याचा प्रतिवादी क्र. १ व २ प्रयत्न करीत आहेत. वादीस प्रथमदर्शनी केस असून सोयीचे संतुलन वादीचे बाजुने आहे. तसेच वादीचे लाभात मनाई हुकूम दिला नाही तर त्याचे अपरिमित नुकसान होऊ शकते. तरी, प्रतिवादी क्र. १ व २ यांनी स्वत: अथवा इतरांमार्फत दावा मिळकतीचे कोणतेही प्रकारे हस्तांतर करु नये, वादीचा हक्क डावलू नये, वादीस हुसकावून लावू नये, दावा मिळकतीवर बोजा निर्माण करु नये, वादीचे अहित होईल असे कोणतेही गैरकृत्य करु नये वादीचे असलेले हक्कास कोणतीही बाधा निर्माण करु नये वादीस व त्याचे कुटूंबियांस कोणतेही प्रकारे त्रास देऊ नये, हरकत, अडथळा करु नये त्याचप्रमाणे वादीचे कब्जास व वापर उपभोगास व्यत्यय आणुन नये  असा तुर्तातुर्त मनाई हुकूम वादीच्या लाभात व्हावा अशी विनंती वादीने केली.

५. प्रतिवादी क्र. १ व २ यांनी निशाणी क्र. १६ प्रमाणे आपले लेखी म्हणणे सादर केले. त्यात प्रतिवादींचे म्हणणे की वादीच्या निशाणी क्र. ५ वरील अर्जातील मजकुर, मागणी खरी व कायदेशीर नाही. त्यांचे पुढे असे म्हणणे आहे की, मयत सुशिलाबाई गोविंदराव मोरे यांनी दिनांक २३/०३/२०१ रोजी केलेले नोंदणीकृत मृत्यूपत्र दस्त क्र. ९५१/२०११ अन्वये प्रतिवादी क्र. १ व २ हे दावा मिळकतीचे कायदेशीर मालक झाले आहेत व त्यांचे नावांची नोंद दावा मिळकतीचे

उता—यावर मालक म्हणून झालेली आहेत. वादीने सदर दावा मुदतीत दाखल केला नाही. दावा मिळकत ही कै.सुशिलाबाई गोविंदराव मोरे यांची स्वकष्टार्जीत मालकीची होती त्यामुळे त्या मिळकतीची विल्हेवाट त्यांच्या मर्जीप्रमाणे लावण्याचा त्यांना कायदेशीर हक्क व अधिकार होता. प्रतिवादींचे पुढे म्हणणे आहे की, कै. सुशिलाबाई यांचे पती कै. गोविंदराव मोरे हे मध्य रेल्वेत नोकरीस होते. कै. सुशिलाबाई यांना दोन मुले नामे चंद्रशेखर व किशारे आणि एक मुलगी नामे दिपा अशी तीन अपत्ये झालेली आहेत. कै. गोविंदराव मोरे यांचे अकस्मात निधनामुळे अनुकंपातत्वावर वादी चंद्रशेखर यास रेल्वेत नोकरी मिळाली आहे व तो नोकरी मिळाल्यापासून स्वतंत्र राहतो. तसेच प्रतिवादी क्र. ३ दिपा ही विवाहीत असून ती तिच्या पतीच्या घरी राहते. वादीने कधीही आईची व कुटूंबाची काळजी घेतली नाही व कोणतही जबाबदारी पार पाडली नाही.

६. प्रतिवादींचे पुढे म्हणणे आहे की, प्रतिवादी क्र. १ याला कुठलीही नोकरी नाही तसेच उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. त्याला दावा मिळकतीशिवाय अन्य कोणताही निवारा नाही. या सर्व बाबी विचारात घेवून कै. सुशिलाबाई गोविंदराव मोरे यांनी प्रतिवादी क्र. १ व २ यांचे निवा—याची कायमस्वरुपी व्यवस्था करण्यासाठी नोंदणीकृत मृत्यूपत्र स्वेच्छेने करुन ठेवलेले होते. वादी व प्रतिवादी क्र. १ यांचे वडीलांचे निधन दिनांक २९/११/१९९३ रोजी झाले. त्यानंतर चाळीसगांव येथील सि.सं.नं. ४५१३ ही मिळकत वडीलांची आई अनुसयाबाई चंद्रराव मोरे यांचे नावावर होती व अनुसयाबाईने तिचे हयातीत या मिळकतीपैकी ६३.०१चौ.मी. हे क्षेत्र वादी व प्रतिवादी क्र. १ चे चुलते दत्तात्रय चंद्रराव मोरे यांना देण्यात आले व उर्वरीत क्षेत्र वादी चंद्रशेखर गोविंदराव मोरे याचे नावाने दिनांक १८/०५/१९९४ रोजी खरेदीने घेण्यात आले. सदर खरेदी घेतली त्यावेळी वादी नोकरीस नव्हता व त्यास उत्पन्नाचे काहीएक साधन नव्हते. सदर मिळकत खरेदीची संपुर्ण रक्कम वादी व प्रतिवादी क्र. १ ची आईने दिली होती व त्या मिळकतीवर वादीस निवासस्थानाची सोय केली होती व आहे. सन १९९५ मध्ये वादीस रेल्वेत कायमस्वरुपी अनुकंपातत्वावर नोकरी लागलेपासून वादी चाळीसगाव येथेच राहत आहे. वादीचा दावा मिळकतीत कधीही

कब्जा नव्हता व नाही. कै. सुशिलाबाई गोविंदराव मोरे यांचा सांभाळ व वैदयकिय उपचार प्रतिवादी क्र. १ किशोर व प्रतिवादी क्र. २ सिमा यांनीच केला आहे. वादीने कै. सुशिलाबाई गोविंदराव मोरे यांची काही एक विचारपुस केली नाही.

७. प्रतिवादींचे पुढे म्हणणे आहे की, कै. सुशिलाबाई गोविंदराव मोरे यांनी दावा मिळकतीचे प्रतिवादींचे लाभात मृत्यूपत्र केलेले आहे. तेंव्हापासून संपुर्ण दावा मिळकत ही प्रतिवादी क्र. १ व २ यांचे कब्जा वहिवाटीत मालकी हक्काने असून ते त्याचा उपभोग घेत आहेत. कै. सुशिलाबाई गोविंदराव मोरे यांनी केलेल्या मृत्यूपत्राची संपुर्ण माहिती व जाणीव वादींना होती व आहे. वादींनी कै. सुशिलाबाई गोविंदराव मोरे यांचे हयातीत या मृत्यूपत्राबद्दल कधीही वाद उपस्थित केला नाही. उपविभागीय अधिकारी येवला यांचे आदेशानुसार प्रतिवादी क्र. १ व २ यांच्या नावाची नोंद दावा मिळकतीचे ७/१२ चे उता—याला मालक सदरी करण्यात आलेली आहे. सदर आदेशाविरुध्द वादीने अप्पर जिल्हाधिकारी मालेगांव यांचेकडे आर.टी.एस. अपिल नं. २०/२०१६ दाखल केले असून त्या अपिलात कनिष्ठ न्यायालयाचे आदेशास कोणतीही स्थगिती दिलेली नाही. वादीस मनाई हुकूम दिलेस प्रतिवादींचे कधीही न भरुन येणारे असे नुकसान होईल. सबब, वादीचा निशाणी क्र. ५ चा अर्ज खर्चासह नामंजुर करण्याची विनंती प्रतिवादींनी केली.

८. प्रतिवादी क्र. ३ यांना समन्सची बजावणी झाली परंतू त्या सदर प्रकरणात हजर न झालेने त्यांच्याविरुध्द दिनांक ०८/०१/२०१८ रोजी निशाणी क्र. १ वर एकतर्फा आदेश पारीत करण्यात आला.

९. वादी व प्रतिवादी क्र. १ व २ यांचे लेखी कथन वाचल्यावर व दोन्ही पक्षांचे म्हणणे ऐकल्यावर खालील मुद्दे निष्कर्षाकरीता उपस्थित झाले आहेत. त्यावर कारणमिमांसेसह मी खालीलप्रमाणे स्पष्टीकरण देत आहे.

| **मुद्दे** | **निष्कर्ष** |
| --- | --- |
| १. प्रथमदर्शनी वाद कोण सिध्द करीत आहे ? | ...वादी. |
| २. सोयीचे संतुलन कोणाच्या बाजुने असल्याचे सिध्द होत आहे ? | ...वादी. |
| ३. कोणाच्या लाभात मनाई हुकूम दिला नाही तर तर त्याचे अपरिमित नुकसान होऊ शकते ? | ...वादी. |
| ४. काय आदेश ? | ...अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्रमांक १ ते ३ साठी :—**

१०. मुद्दा क्र. १ ते ३ हे परस्परांशी निगडीत असल्यामुळे सोयीसाठी व चर्चेची पुनरावृत्ती टाळण्यासाठी मी सदर तिन्ही मुद्दे एकत्रितरित्या चर्चेसाठी घेत आहे.

११. सदर प्रकरणात निशाणी क्र. ५ चे अर्जावर दोन्ही पक्षांचे म्हणणे ऐकले. सदर प्रकरणात वादी व प्रतिवादी क्र. १ व २ यांनी दाखल केलेल्या दस्तऐवजांचे अवलोकन केले. वादीने सदर दावा हा प्रतिवादींविरुध्द जाहिर ठराव करणेबाबत तसेच वाटप व निरंतर ताकीदसाठी दाखल केला आहे. वादीने सदर दावा मिळकतीत त्याचा हक्कसंबंध असून प्रतिवादी क्र. १ यांच्या हक्कात सुशिलाबाई मोरे यांनी करुन दिलेले मृत्यूपत्र हे वादीवर बंधनकारक नाही असे कथन केले आहे. तसेच वादी हा दावा मिळकतीत रहात असून प्रतिवादी क्र. १ व २ त्याच्या ताब्यास हरकत, अडथळा करीत असून बळजबरीने कब्जा घेण्याच्या तयारीत असल्याचे सांगितले आहे. याउलट प्रतिवादी क्र. १ व २ यांचे म्हणणे की सुशिलाबाई मोरे हिने प्रतिवादी क्र. १ याचे हक्कात नोंदणीकृत मृत्यूपत्र करुन दिले असून दावा मिळकतीवर त्याचा कायदेशीर हक्क असून ताबाही त्याचाच आहे. वादीला चाळीसगांव येथील वडीलोपार्जित शेती दिलेली असून तो मनमाड येथे रहात नाही व वादीचा दावा मिळकतीशी कोणताही

हक्क संबंध नाही.

१२. सदर प्रकरणात वादी व प्रतिवादी क्र. १ व २ यांनी आपआपले कथन प्रथमदर्शनी सिध्द करण्यासाठी दस्तऐवज दाखल केले आहेत. त्यात वादीने दावा मिळकतीचे गाव नमुना ७ चा उतारा, मृत्यूपत्राची झेरॉक्स प्रत, फेरफार नोंदवहीची झेरॉक्सची प्रत तसेच अप्पर जिल्हाधीकारी कार्यालय यांचेकडील नोटीसची झेरॉक्स प्रत, वादी याचे रेशनकार्डची झेरॉक्स प्रत तसेच वादीचे एच.पी. गॅस कंपनीचे सिलेंडर असल्याबाबतचे दस्ताची झेरॉक्स प्रत दाखल केली असून वादीने आपल्या निशाणी क्र. ५ च्या कथनाला पुष्ठी देणारे स्वतःचे शपथपत्र तसेच निशाणी क्र. २३ प्रमाणे वादीचा मुलगा व मुलगी शिक्षण घेत असल्याचे शाळेचे दस्तऐवज व इतर दस्तऐवज दाखल केले. तसेच वादीने आपल्या कथनाला पुष्ठी देण्यासाठी साक्षीदार मिना कुलकर्णी व रतनलाल शाकद्विपी यांचे शपथपत्र दाखल केले आहे. तसेच प्रतिवादी क्र. २ हिचे रुपये १००/— च्या स्टॅम्पवरील प्रतिज्ञापत्राची झेरॉक्स प्रत दाखल केली आहे. याउलट प्रतिवादी क्र. १ व २ यांनी निशाणी क्र. २७ च्या यादीप्रमाणे उपविभागीय अधिकारी, येवला यांचेकडील निकालपत्राची झेरॉक्स प्रत, अप्पर जिल्हाधिकारी, मालेगांव यांचेकडील अपिलाची झेरॉक्स प्रत, गाव नमुना ७ ची झेरॉक्स प्रत तसेच मनमाड नगरपरिषद यांचेकडे कर दस्त, दावा मिळकतीचे विदयुत बिल, सुशिलाबाई मोरे यांचे मृत्यूप्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत, प्रतिवादी क्र. २ हिचे रुपये १००/— च्या स्टॅम्पवरील प्रतिज्ञापत्र इत्यादी दस्त दाखल केले आहेत. तसेच प्रतिवादी क्र. १ यांनी स्वतःचे शपथपत्र दाखल केले असून साक्षीदार जितेंद्र चौधरी याचे शपथपत्र दाखल केले आहे.

१३. वादी याने त्याच्या दाव्यामध्ये सुशिलाबाई मोरे हिने करुन दिलेले मृत्यूपत्र हे बेकायदेशीर असल्याचे जाहिर ठराव करुन मिळावे असे म्हंटले आहे. वादी व प्रतिवादी क्र. १ व २ यांनी परस्परविरोधी शपथपत्र प्रकरणात दाखल केले आहेत. प्रतिवादींनी वादीला चाळीसगांव येथील शेतजमिन दिल्याचे कथन केले परंतू त्याबाबतचा कोणताही प्रथमदर्शनी पुरावा प्रकरणात दाखल केला नाही. प्रकरणात दाखल एकुणच दस्तऐवजांवरुन प्रथमदर्शनी लक्षात येते की, वादी हा दावा

मिळकतीच्या ताब्यात असून तो त्याच्या कुटूंबासोबत तेथे राहतो. वादी याने सदर प्रकरणात दावा मिळकतीत त्याचा हिस्सा असल्याचीही मागणी करुन वाटपाचीही मागणी केली आहे.

१४. सदर प्रकरणात दोन्ही पक्षाला आपआपले कथन योग्य पुराव्यानिशी सिध्द करणे आहे. अशा परिस्थितीत, वादी यांना दावा मिळकतीतील त्यांच्या ताब्याबाबत प्रतिवादी क्र. १ व २ यांनी हरकत, अडथळा करु नये व त्याबाबत तुर्तातूर्त मनाई हुकूम वादीच्या हक्कात दिल्यास कोणाचेही नुकसान होणार नाही असे मला प्रथमदर्शनी वाटते. एकुणच प्रकरण प्रथमदर्शनी वादीच्या लाभात असल्याचे दिसत असून सोयीचे संतुलन वादीच्याच बाजुने आहे. तरी, माझे वरील विवेचनावरून मी मुद्दे क्र. १ ते ३ चे निष्कर्ष येणेप्रमाणे नोंदवून मुद्दा क्र.४ च्या निष्कर्षासाठी खालील आदेश पारीत करीत आहे.

## :: आदेश ::

१. वादीचा तुर्तातुर्त मनाई हुकूमाचा अर्ज निशाणी क्र.५ मंजुर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. १ व २ यांनी या दाव्याचा अंतिम निकाल लागेपावेतो त्यांनी स्वत: अथवा इतरांमार्फत दावा मिळकतीचे कोणत्याही प्रकारे हस्तांतर करु नये, वादीचा हक्क डावलू नये, वादीस हुसकावुन लावू नये, दावा मिळकतीवर बोजा निर्माण करु नये तसेच वादीचे अहित होईल असे कोणतेही गैरकृत्य करु नये व वादी व त्याचे कुटूंबियास कोणत्याही प्रकारे त्रास देऊ नये, हरकत, अडथळा करु नये अशा आशयाचा तुर्तातुर्त मनाई हुकूम देण्यात येतो.

दिनांक: २२/०२/२०१८ (स्वाती वि.फुलबांधे)
स्थळ : मनमाड. दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
मनमाड, (शहर न्यायालय).

**नि.दि.दावा क्र. १४/२०१६**

चंद्रशेखर गोविंदराव मोरे

विरुध्द

किशोर गोविंदराव मोरे वगैरे ३

:: **आदेश (ऑपरेटीव्ह)** ::

१. वादीचा तुर्तातुर्त मनाई हुकूमाचा अर्ज निशाणी क्र.५ मंजुर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. १ व २ यांनी या दाव्याचा अंतिम निकाल लागेपावेतो त्यांनी स्वत: अथवा इतरांमार्फत दावा मिळकतीचे कोणत्याही प्रकारे हस्तांतर करु नये, वादीचा हक्क डावलू नये, वादीस हुसकावुन लावू नये, दावा मिळकतीवर बोजा निर्माण करु नये तसेच वादीचे अहित होईल असे कोणतेही गैरकृत्य करु नये व वादी व त्याचे कुटूंबियास कोणत्याही प्रकारे त्रास देऊ नये, हरकत, अडथळा करु नये अशा आशयाचा तुर्तातुर्त मनाई हुकूम देण्यात येतो.

दिनांक: २२/०२/२०१८
स्थळ : मनमाड.

(स्वाती वि.फुलबांधे)
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
मनमाड,(शहर न्यायालय).